जा.क्र. 7025/2018
धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक - 10 SEP 2018

**परिपत्रक क्र.** ५४८ **दिनांक** १०/०९/२०१८

राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना असे निर्देशित करण्यात येते की, धर्मादाय कार्यालय हे विश्वस्त संस्थांशी संबंधित असून या संस्थांमध्ये धार्मिक, सामाजिक तसेच शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. राज्यामध्ये लाखो धर्मादाय संस्था नोंदणीकृत असून या संस्थांपैकी जवळपास १,३०,००० संस्थांच्या वर संस्था निष्क्रिय संस्था म्हणून रद्द करण्यात आलेल्या आहेत. यापैकी अनेक संस्था या कार्यरत आहेत. परंतु त्यांना महाराष्ट्र विश्वस्तव्यवस्था कायद्यातील तरतुदींची माहिती नसल्यामुळे या संस्थांनी विहीत वेळेत बदल अर्ज व ऑडीट रिपोर्ट दाखल केले नाहीत म्हणून या संस्था रद्द करण्यात आल्या आहेत. अनेक विश्वस्त संस्था चांगले काम करत आहेत, परंतु विश्वस्तव्यवस्था कायद्यातील तरतुदींचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विश्वस्तांना संस्थेच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन अथवा माहिती उपलब्ध होत नाही अथवा विश्वस्तांच्या प्रश्नांना उत्तरे मिळत नाहीत. त्यामुळे प्रत्येक जिल्हा स्तरावर "विश्वस्त दिवस" साजरा करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा स्तरावरील सर्व अधिकाऱ्यांनी प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सकाळी १०.०० ते २.०० या वेळेत विश्वस्तांच्या अडीअडचणी जाणून घ्याव्यात व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. सदरील अडीअडचणी या धर्मादाय कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांशी संबंधित असल्यास अशा अडीअडचणींबाबत त्यांना कुठलाही सल्ला देऊ नये. परंतु प्रलंबित प्रकरणांव्यतिरिक्त असणाऱ्या अडीअडचणी व मार्गदर्शन या दिवशी करण्यात यावे. जर तिसऱ्या शनिवारी सुट्टी आली तर पुढील महिन्याच्या पहिल्या

शनिवारी विश्वस्त दिवस घेण्यात यावा. ज्या जिल्ह्यात दोन अधिकारी असतील अथवा जास्त अधिकारी असतील अशा जिल्ह्यात सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्याने सदर विश्वस्त दिवसाचे आयोजन करावे. विश्वस्त दिवसाच्या आयोजनाची माहिती व केलेली कार्यवाही याचा अहवाल प्रत्येक महिन्यास मुख्यालयास सादर करावा.

10.9.18

(शिवकुमार डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. अधिक्षक, आस्थापना शाखा, मुख्यालय
६. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)